# जहाज

"Welcome to Canada and Thank you for your help in the government project"; व्हिसाचा स्टॅम्प मारता मारता कॅनेडीअन इमिग्रेशन ऑफिसरचे उद्गार माझ्या अंगावर दोन मूठ मास चढवतात. अमेरिकन पासपोर्ट आणि माझ्या कंपनीचं बिझीनेसची परमिशन असणारं पत्र घेऊन माझं कॅनडात पदार्पण. मी सॉफ्टवेअरचं काम ज्यांच्यासाठी करायला आले आहे ती गर्व्हमेंटची एक एजन्सी असल्यानं इमिग्रेशन ऑफिसरनं केलेला गर्व्हमेंटचा उल्लेख. आणि त्यामुळे माझी मान जरा आणखीनच ताठ होते. आपण कोणीतरी बनलोय असा स्वतःशी ग्रह करून घेत माझं ऑफिसकडे प्रयाण. इथलं वातावरण अगदीच आपुलकीचं. एअरपोर्ट पासून ते कामावरची सगळीच माणसं खूपच मनमोकळी. अगदी आपण घरी आलो आहोत असंच वाटत राहातं. फिनीक्स ते व्हँकुव्हर असा प्रवास आणि कामही एकाच दिवशी करुन दमून्-भागून संध्याकाळी उशिरा मी हॉटेलकडे परतते. हॉटेलही एकदम अत्याधुनिक. कोल हार्बरच्या अगदी काठावरच. बेचा सुंदर देखावा खोलीच्या खिडकीतून. काठावरती ऑलिम्पिकची निळीशार फ्लेम. आणि पाण्याच्या मध्यभागी स्टॅनली पार्क. पाण्याचं माणसाला आदिकालापासूनच आकर्षण. हे शहरही त्याला अपवाद नव्हतं. बेच्या काठावरती विविध मनोरंजनाची आकर्षणं आणि खरेदीसाठी जागा. ह्या साऱ्याचा मनावरचा ठसा मला सकाळी लवकरच उठवतो; आणि मी सूर्योदयाच्या आधीच बेच्या काठावरती चालायला जायला निघते.

हवेत बोचरा थंडावा. पाण्यावर शांतपणे तरंगणारे बदक आणि गीजचे थवे; त्यांच्याशी बरोबरी करणारा पडाव्यातला माणसांचा जथा देखील. बेच्यापलिकडे पांघरूणात गुडूप झोपलेल्या वसाहती. सारेच नजर लागण्यासारखे देखणे. बेमधे उठणाऱ्या हलक्याशा लाटांचा आवाज, सीप्लेनची घरघर आणि सीगलचे मधूनच उठणारे चित्कार यांच्याबरोबर माझ्या श्वासाची लय आणि चालण्याची गति जुळते. पाहता पाहता २ मैलांचं अंतर पार करून मी एका बागेपाशी पोचते. अतिशय देखणी बाग. मेपलच्या झाडांनी हळूहळू रंग बदलायला सुरूवात केल्यानं येणाऱ्या थंडीची जाणीव होवून अंगावर शहारा येतो. नुकताच सूर्योदय झाल्यानं सगळं काही सोनेरी उन्हात न्हाहून निघू लागतं. तेवढयात एका उंचवट्यावर काहीतरी स्मारकासारखे दिसते. मी कुतूहलाने त्याकडे वळते.

भारतीय वंशाच्या दिसणाऱ्या माणसांच्या समुहाचा एक भला मोठा फोटो आणि त्याच्या शेजारी काही लिखाण. ते पाहून माझी उत्सुकता आणखीनच वाढते आणि मी ती पाटी वाचू लागते. मे १९२४ साली कॅनडात प्रवेश करण्याचा प्रयत्न केलेल्या परंतू तो नाकारण्यात आलेल्या भारतीय लोकांचा तो फोटो. प्रवेश नाकारण्याचे कारण म्हणजे ते सारे भारतीय - एशियन होते. त्याकाळी अमेरिका, कॅनडा आणि इतर काही देशांमधे एशियन लोकांना दूर ठेवण्यासाठी prejudicual/ exclusion immigration laws अंमलात होते. एका जपानी जहाजातून या तीनशे शहात्तर लोकांनी महिनोंमहिने प्रवास केला परंतू इथे पोचल्यावर त्यांना तीन महिने त्या जहाजावरच ठेवून सरतेशेवटी भारतात परत पाठवण्यात आल्याच्या ऐतिहासीक घटनेची नोंद त्या पाटीवरती. त्या घटनेनंतर बऱ्याच लोकांनी लढा दिला आणि शेवटी कॅनडा सरकारला आपले नियम बदलून ते सर्वसमावेशक करावे लागले. ५ महिने समुद्रात नांगर टाकून ठेवलेल्या त्या लोकांची काय अवस्था झाली असेल या विचाराने माझ्या डोळ्यातून धारा वाहू लागतात. जिथं ते जहाज ठेवलं होतं तीच जागा या स्मारकाच्याइथून दिसेल अशी जागा निवडण्यात आली होती. मी तिकडं वळुन पाहाते आणि आता तो बे मला काही वेगळाच दिसू लागतो.

मला कामावर जायचंय याचं भान येवून मी परतीची वाट चालू लागते. मगाच्या सीप्लेनची घरघर आणि सीगलचे चित्कार आता मनावर ओरखडे उठवू लागतात. लाटांच्या मंद आवाजातून पाण्यात बुडालेले ३७६ जणांचे आवाज ऐकू येऊ लागतात. मी आजूबाजूला पाहाते. खरंतर बदल तर काहीच झालेला नसतो. स्वच्छ निळा वारा आपल्याच नादात वाहात असतो. आधुनिकतेचा स्पर्श झालेला किनारा शांतपणे पहुडलेला असतो; त्याला कधी हि बोच जाणवत असेल का हा विचार मनात रेंगाळून जातो. जगण्याला बळ देणाऱ्या इतिहासातल्या ह्या अशा एकेक मूल्यवान घटना. आपल्यासारख्याच - हाडामासाच्या आणि म्हटलं तर सामान्य माणसांनीच घडवून आणलेल्या.पण त्यांच्या मातीमधलं सोनं हे असं कधीतरी चमकून जातं. माझ्या भवतालचा सोनेरी प्रकाश आता सूर्याचा नव्हता तर तर या माणसांच्या मातीमधल्या सोन्याचा होता. प्रकाश बदलला की सावल्याही बदलतात. इतकावेळ एकाकी असणारी माझी सावली आता निव्वळ एकटीची उरली नव्हती तर त्या ३७६ जणांच्या सावल्याही माझ्याबरोबर होत्या. आणि मग सकाळपासून सावलीसारखा सांभाळलेला माझा मोठेपणा गळून पडतो. लक्षात येतं की आज या देशात आपलं जे स्वागत झालं त्याला कारणीभूत आहेत हे ३७६ जीव. मी फार काही मोठं करते आहे या मानाचं मोरपिस जे मी दिवसभर वागवलं ते मिळालंय ते यांनी दिलेल्या लढ्यानं. मग उरलेले सगळे दिवस मी या उबदार सावल्यांच्या सान्निध्यात नम्रपणे घालवते.

असं थोडं "शहाणं" होण्याचं हे एक निमीत्त; निव्वळ या जन्मीच नव्हे तर जन्म-जन्मांतरी पुरेल इतकं!!

शिल्पा केळकर उपाध्ये (Phoenix, AZ)